सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२०/M/००११३६**

**अपिलार्थी श्री. अरूण लक्ष्मण जगताप**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
विक्रोळी विभाग, विक्रोळी पोलीस ठाणे इमारत, दुसरा मजला
कन्नमवार नगर, विक्रोळी (पू), मुंबई-४०० ०८३.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (परिमंडळ-७)**
मुलुंड पोलीस ठाणे इमारत, मुलुंड (पश्चिम) मुंबई -४०० ०८०.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.१०.२०२१**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.१०.२०१९ | ०७.११.२०१९ | १३.१२.२०१९ | २७.०२.२०२० |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २९.०७.२०२० रोजीच्या अर्जान्वये खालील कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे:-

"अपिलकर्त्याचे प्रथम अपील अमान्य करुन निकाली काढण्यात आलेल्या आदेशाने अपिलकर्ता हा अत्यंत व्यथीत झाल्यामुळे व चुकीचा निर्णय, कलमाचा गैरवापर, उचित न्याय न मिळाल्यामुळे प्रथम अपील आदेशाविरुध्द मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई, राज्य माहिती आयोग, मुंबई यांचेकडे व्दितीय अपील अर्ज करीत आहे."

अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०७.११.२०१९ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २७.०२.२०२० संलग्न केलेले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ३०.१०.२०१९ च्या माहिती अर्जान्वये "दि. ०९.०५.२०१९ रोजी व दि. १०.०५.२०१९ रोजीचे विक्रोळी पोलीस ठाणेमधील व विक्रोळी पोलीस ठाणेच्या परिसरातील कंपाऊडमधील आणि कंपाऊंड बाहेरील लावलेले सर्व सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज सीडीमध्ये व पेनड्राइव्हमध्ये त्वरीत मिळावे." असा माहितीचा विषय नमूद करुन खालील १ ते ४ मुद्दान्वये माहितीची मागणी केली आहे :-

१) दि. ०९.०५.२०१९ रोजी विक्रोळी पोलीस ठाणेमधील स्टेशन हाउसचे ड्युटी ऑफीसर रुममधील दुपारी ०५.०० वाजता ते संध्याकाळी ०८.०० वाजता व रात्री ११.०० वाजता ते रात्री ११.४५ वाजता सुमाराचे सर्व सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज सीडीमध्ये व पेनड्राइव्हमध्ये मिळावे.

२) दि. ०९.०५.२०१९ रोजी विक्रोळी पोलीस ठाणेमधील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एसीपी, पोलीस निरीक्षक, श्री. नामदेव शिंदे, पोलीस निरीक्षक श्री. सोनावणे, पोलीस निरीक्षक श्री. सुनिल कदम यांचे ऑफीसमधील व ऑफीस बाहेरील दुपारी ०५.०० वाजता ते संध्याकाळी ८.०० वाजता सुमाराचे सर्व सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज सीडीमध्ये व पेनड्राइव्हमध्ये मिळावे.

३) दि. ०९.०५.२०१९ रोजी विक्रोळी पोलीस ठाणेमधील तळमजल्यावरील आरोपींच्या पोलीस कोठडीच्या दरवाजा बाहेरील रात्री ११.०० वाजता ते रात्री ११.३० वाजता सुमाराचे सर्व सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज सीडीमध्ये व पेनड्राइव्हमध्ये मिळावे.

४) दि. ०९.०५.२०१९ रोजी विक्रोळी पोलीस ठाणेच्या परिसरातील कंपाऊंडमधील व कंपाऊंड बाहेरील दि. ०९.०५.२०१९ रोजी दुपारी ०५.०० ते रात्री ११.५९ वाजता आणि दि. १०.०५.२०१९ रोजी पहाटे १२.०० वाजता ते पहाटे ०३.०० वाजता सुमाराचे सर्व सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज सीडीमध्ये व पेनड्राइव्हमध्ये मिळावे."

३. वरील माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.११.२०१९ च्या पत्रान्वये अपिलार्थींना खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे:-

"अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती केंद्राचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ कलम ८(१)(त्र) अन्वये नाकारण्यात येत आहे."

४. जन माहिती अधिकारी यांच्या वरील उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी दि.१३.१२.२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०२.२०२० च्या आदेशान्वे खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे:-

"अपिलार्थी प्रथम अपील सुनावणीसाठी वारंवार अनुपस्थित असतात. अपिलार्थींनी त्यांच्या मुळ माहिती अधिकाराच्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार नाकारण्यात आलेली आहे. सदरचे अपील अमान्य करुन निकाली काढण्यात येत आहे."

५. सुनावणीवेळी अपीलार्थी यांनी असे विषद केले की, विक्रोळी पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्या विरोधात त्यांच्या विरोधकांनी काही पोलीसांना हाताशी धरुन संगनमताने ०२ खोटे दखलपात्र गुन्हे दाखल केलेले आहेत. सदर प्रकरणी त्यांना मारहाण करण्यात आली होती. सद्य:स्थितीत सदर दोन्ही गुन्ह्यासंबंधी मा. कोर्टात केस दाखल झाली असून उचित आदेशास्तव प्रलंबित आहे. त्यामुळे स्वत: च्या हितासाठी / बचावासाठी व सुरक्षिततेसाठी आणि या प्रकरणात वरिष्ठ शासन यंत्रणेकडे व न्यायालयात उचित न्याय व दाद मागण्याकरिता विक्रोळी पोलीस ठाणे मधील व परिसरामधील दि. ०९.०५.२०१९ रोजीचे दुपारी ०५.०० ते रात्री ११.४५ व दि.१०.०५.२०१९ रोजीचे रात्री १२.०० ते पहाटे ०३.०० या सुमाराचे सर्व सी.सी.टि.व्ही. कॅमेरा फूटेज त्यांना आवश्यक असून ते देण्याबाबत आदेश व्हावेत.

६. सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांनी असे विषद केले की, अपिलार्थी यांचे त्यांच्या परिसरातील श्रीमती सनोज चौरसीया व तिचे कुटूबींय यांच्यासोबतच्या आपसी भांडण / वादामुळे अपिलार्थींच्या विरोधात विक्रोळी पोलीस ठाण्यात दि.०९.०५.२०१९ रोजी एफ.आय.आर. दाखल केले आहे. त्यामध्ये पोलीस

विभागातील कर्मचारी / अधिकाऱ्यांचा अथवा त्यांच्या कार्यवाहीचा काहीही संबंध नसून, त्रयस्थ पक्षाबरोबर उद्भवलेल्या वैयक्तिक वादांच्या अनुषंगाने त्यांच्याविरोधात गुन्हा नोंदविल्याने ते पोलीस स्टेशनमधील सर्व कार्यालयीन व परिसरातील सी.सी.टि.व्ही.फुटेजची मागणी करतात. परंतु, त्यामध्ये इतर लोकांचेही कव्हरेज असल्यामुळे कलम ८(१) (त्र) नुसार मागितलेली माहिती नाकारण्यात आली आहे.

तसेच, त्यांनी असेही विषद केले की, सी.सी.टि.व्ही.फुटेज ०३ महिन्यापर्यंत स्टोअर करण्यात येते. परंतु, अपिलार्थींनी सदर फुटेजची माहिती जवळपास ०५ महिने २० दिवसानंतर मागणी केली आहे. या कारणामुळे आता माहिती उपलब्ध नाही.

७. याबाबत, अपिलार्थीनी आक्षेप घेवून असे विषद केले की, सी.सी.टि.व्ही.फुटेज जपून ठेवण्याविषयी पोलीस विभागाचे व न्यायालयाचे निर्देश आहेत ते सादर करण्यासाठी वेळ द्यावी.

त्यानुसार अपिलार्थी यांनी ०२ दिवसांत त्यांचे लेखी निवेदन सादर करावे त्यानंतर या प्रकरणी आदेश पारित करण्यात येतील असे मौखिक निर्देश देण्यात आले होते.

त्याप्रमाणे अपीलार्थी यांनी दि.०८.१०.२०२१ च्या पत्रान्वये राज्य मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी कलम १९ (८) (क) अन्वये दि.१३.०६.२०१६ रोजी गृह विभागास दिलेले निर्देश / आदेशाची प्रत व मा. सर्वोच्च न्यायालयाचे स्पेशल लिव्ह पिटीशन (क्रिमिनल) नं.३५४३/२०२०, आदेश दि. ०२.१२.२०२० ची प्रत आयोगास सादर केली आहे.

८. या अपिलासंदर्भातील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोगाच्या असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दि.३०.१०.२०१९ च्या माहिती अर्जान्वये वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विक्रोळी पोलीस ठाणेमधील - (१) स्टेशन हाऊसचे ड्युटी ऑफिसर रुममधील, (२) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एस.सी.पी. यांच्या ऑफिस मधील व ऑफिस बाहेरील, (३) तळमजल्यावरील आरोपींच्या पोलीस कोठडीच्या दरवाजा बाहेरील, (४) परिसरातील कंपाऊंडमधील व कंपाऊंड बाहेरील अशा ०४ ठिकाणांची दि. ०९.०५.२०१९ रोजीचे दुपारी ०५.०० ते रात्री ११.४५ व दि.१०.०५.२०१९ रोजीचे रात्री १२.०० ते पहाटे ०३.०० या सुमाराचे सर्व सी.सी.टि.व्ही. कॅमेरा फूटेजची माहिती मागितली होती.

त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी वरील परि क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दि.०७.११.२०१९ च्या पत्रान्वये, अधिनियमाच्या कलम ८ (१) (त्र) अन्वये माहिती नाकारली आहे. तर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी वरील परि क्र.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही ग्राह्य धरुन प्रथम अपील अमान्य करुन निकाली काढले आहे.

एकंदरीत या प्रकरणात अपिलार्थी यांनी त्यांच्यावरील दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने पोलीस स्टेशनमधील संबंधीत तारखांना व वेळेला घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने सी.सी.टि.व्ही.फुटेजच्या माहितीची मागणी केली आहे व सदर माहिती मागणीच्या समर्थनार्थ त्यांनी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे दि. १३.०६.२०१६ चे आदेश व मा. सर्वोच्च न्यायालयाचे स्पेशल लिव्ह पिटीशन (क्रिमिनल) नं.३५४३/२०२० संदर्भातील दि. ०२.१२.२०२० चे आदेश संदर्भ म्हणून सादर केले आहेत, ते विचारात घेण्यात आले.

- राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे दि.१३.०६.२०१६ च्या आदेशान्वये पोलीस ठाण्याच्या स्तरावर जतन करण्यात येणा-या वेगवेगळ्या अभिलेखांबाबत मार्गदर्शिका व नागरिकांना द्यावयाच्या माहितीबदल प्रपत्र निश्चित करुन परिपत्रक पारित करण्याचे निर्देश दिले आहेत. यामध्ये सी सी.सी.टि.व्ही.फुटेजच्या विषयाचा देखिल समावेश आहे. परंतु, आयोगाच्या सदर निर्देशामध्ये सी.सी.टी.व्ही.फुटेज किती कालावधीसाठी जतन करण्यात यावेत याबाबत कोणतेही स्पष्ट निर्देश दिलेले नाहीत.

  तथापि, सदर निर्देशानुसार पोलीस महासंचालक कार्यालयाने दि.२४.१०.२०१६ च्या परिपत्रकानुसार " पोलीस ठाण्यांचा सी.सी.टि.व्ही.फुटेज ३० दिवसांपर्यंत जतन करुन ठेवावा." असे निर्देश दिले आहेत.

- तर, मा. सर्वोच्च न्यायालयाने स्पेशल लिव्ह पिटीशन (क्रिमिनल) नं.३५४३/२०२०, आदेश दि. ०२.१२.२०२० अन्वये प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसविण्यासंदर्भात शासनास निर्देश दिले असून, सदर बसविण्यात येणाऱ्या सी.सी.टी.व्ही.कॅमेऱ्यांची डेटा स्टोअर कॅपेसिटी / फुटेज जतनाचा कालावधी (Period of Preservation) किमान १८ महिने परंतु ०१ वर्षापेक्षा कमी नाही इतक्या कालावधीचा राहील असेही निर्देश दिले आहेत.

राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या दि.१३.०६.२०१६ च्या कलम १९ (८) (क) अन्वयेच्या निर्देशाप्रमाणे व पोलीस विभागाच्या परिपत्रकानुसार सी.सी.टी.व्ही.फुटेज ३० दिवसापर्यंत जतन करायचे होते. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, सी.सी.टि.व्ही.फुटेज ०३ महिन्यापर्यंत स्टोअर करण्यात येतात. परंतु, अपिलार्थीनी सदर फुटेजची माहिती घटना घडल्याच्या ०५ महिन्यानंतर मागणी केली. या कारणामुळे संबंधित फुटेजचा डेटा स्टोअरेजमधून निघुन गेल्याने आता सदर माहिती कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नाही.

तर, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातील निर्देशाप्रमाणे सी.सी.टी.व्ही.फुटेज १८ महिने किंवा कमीत कमी ०१ वर्षापर्यंत जतन करणे अभिप्रेत आहे. परंतु, सदरचे आदेश हे दि.०२.१२.२०२० रोजीचे असून अपीलकर्त्यांची माहितीची मागणी ही या आदेशापुर्वीची (दि.३०.१०.२०१९) आहे. म्हणून, या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या वर नमूद निर्णयातील निर्देश पुर्वलक्षी प्रभावाने (Retrospective effect) लागू करता येणार नाही.

तसेच, अपिलार्थीनी मागणी केलेल्या संबंधित दिनांकाच्या सी.सी.टी.व्ही. फुटेजमध्ये इतर त्रयस्थ व्यक्तींचे कव्हरेज / समावेश असून शकते, ही बाब लक्षात घेवून अपिलार्थी यांनी अशा स्वरुपाची माहिती मागणीचा स्पष्ट व समर्थनीय कारण / उद्देश प्रकट करणे आवश्यक ठरते. परंतु, त्यांनी तसे कोणतेही कारण प्रकट केलेले नाही.

वरील विवेचन लक्षात घेता आयोग या निष्कर्षावर येत आहे की, माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती नागरिकास पुरविणे अभिप्रेत व बंधनकारक आहे. परंतु, या प्रकरणात तशी परिस्थिती दिसून येत नाही. कारण अपिलार्थीनी मागणी केलेली सी.सी.टी.व्ही.फुटेजची माहिती तांत्रिक दृष्टया आता रेकॉर्डवर उपलब्ध नाही व जी माहिती उपलब्ध नाही ती देता येणे शक्य नाही.

..५/-

तथापि, पोलीस स्टेशनमध्ये सी.सी.टी.व्ही.कॅमेरा ज्या कंपनीने इंनस्टॉल केले आहेत अथवा मेनटेन्सचे कामकाज सांभाळतात त्या एजन्सी / कंपनीच्या तंत्रज्ञाची तांत्रिक मदत / सहाय्य घेवून सदर दिनांकाचे व वेळेचे फुटेज पुनर्स्थापित (Restore) करुन अपिलार्थीस माहिती देणे योग्य राहिल. सदर कार्यवाही करुनही फुटेजची माहिती उपलब्ध झाली नाही तर तसे स्पष्ट व विविक्षीत उत्तर अपिलार्थीस देणे योग्य राहिल. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१. जन माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, अपिलार्थींनी माहिती अर्जान्वये मागणी केल्याप्रमाणे संबंधित दिनांकाचे व वेळेचे फुटेज संबंधित एजन्सी / कंपनीच्या तंत्रज्ञाचे सहाय्य घेवून पुनर्स्थापित (Restore) करुन ०१ महिन्यात विहित शुल्काची आकारणी करुन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

**२. वरीलप्रमाणे डेटा पुनर्स्थापितची कार्यवाही करुनही फुटेजची माहिती उपलब्ध झाली नाही तर तसे संबंधित तंत्रज्ञाच्या प्रमाणपत्रासहीत स्पष्ट व विविक्षीत उत्तर अपिलार्थीस ०१ महिन्यात देण्यात यावे.**

**३. यासह अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

सुनील पोरवाल

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : १९.०४.२०२२